<u>सं. फौ. ख. क्र.५९/२०१८</u> **निशाणी क्र.१९**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,</u>**

नाव – अनुसया भागवत मुंडे

वय – ३० वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – रा. जोडआंबा वस्ती, ता. वडवणी, जि. बीड.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. ए. डी. साखरे यांचेमार्फत सरतपास दु.१.३० वा. सुरुः</u>**

**१.** घटना ही दिनांक २३.०३.२०१८ रोजी रात्री ८.०० वा. पुसरा फाटा येथे घडली आहे. त्यावेळी मी माझ्या घरी होते. आमचे पाहुणे श्रीराम मुंडे यांनी मला फोन करुन असे सांगितले की, तुमच्या मालकाचा पुसरा शिवारात अपघात झाला आहे. त्यामुळे मी स्वतः, माझी सासु इंदुबाई आणि माझे सासरे अभिमान आम्ही तिघेजण खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो होतो. घटनास्थळावर ट्रॅक्टर आणि मोटार सायकल पडलेली मी पाहिली. तेथे हजर असलेल्या लोकांनी आम्हाला असे सांगितले की, मोटार सायकल चालविणा–या माणसाला जास्त मार लागला असल्यामुळे त्यांना वडवणी येथील सरकारी दवाखान्यात नेले आहे, त्यामुळे आम्ही वडवणी येथील सरकारी दवाखान्यात गेलो.

**२.** त्या ठिकाणी गेले असता मला असे दिसले की, माझ्या मालकाची बॉडी रुग्णवाहीका मध्ये होती, आणि त्यांच्या शरीरावर डोक्याला लागुन रक्त वाहत होते, तसेच शरिराला मुक्का मार लागला होता. डॉक्टरांनी तपासल्यानंतर माझ्या मालकाला मृत घोषित केले होते. मृत शरिराचे शवविच्छेदन करुन आमच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर आम्ही गावाला जावुन अंत्यसंस्कार केले. त्यानंतर माझे दिर रमेश अभिमान मुंडे यांनी ट्रॅक्टर चालकाविरुद्ध पोलीस स्टेशन वडवणी येथे तक्रार दाखल केली.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एस. उजगरे यांच्यामार्फत</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालकाचा अपघात मी स्वतः प्रत्यक्ष पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघताच्या वेळी कोणता व्यक्ती ट्रॅक्टर चालवित होता हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालकाचा अपघात झाल्यामुळे नुकसान भरपाईचा दावा दाखल केला आहे. पोलीसांनी माझ्याकडे सदर प्रकरणाविषयी चौकशी केली होती. तक्रार दाखल केल्यानंतर पोलीस किती दिवसानंतर चौकशीसाठी आले

होते हे मला आठवत नाही. पोलीस माझ्याकडे एकदाच चौकशीसाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मालकाचा अपघात ट्रॅक्टरमुळे झाला आहे हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नुकसान भरपाईचा दावा दाखल करण्यासाठी सदर तक्रार दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष दिली आहे.

**दु. १.४० वा. उलटतपास पुर्ण.**

फेरतपास नाही.

**दिनांकः– ११.११.२०२५**

| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
|---|---|
| sd/– | sd/– |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, |
| वडवणी, जि. बीड. | वडवणी, जि. बीड. |